# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensational Crimes**

**Police Station** :- **PS Shipur**

**Date of Good Work done** :- **17/01/2022**

**Brief of the work done :-**

**पोलीस स्टेशन शिरपूर जैन येथील मृतक चेतन मुंदडा याच्या खुनाच्या गुन्हयातील आरोपी नामे श्रीकांत महादेव गोरे यास पो.स्टे. @PS_Shirpur च्या तपास पथकाने शिताफीने 24 तासात अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.**

लोकमत

## खून प्रकरणातील आरोपीस अटक!

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** शिरपूर येथील चेतन धोंडूलाल मुंदडा या युवकाच्या खून प्रकरणातील आरोपीस शिरपूर पोलिसांनी चांडस (ता. मालेगाव) येथे सोमवारी अटक केली. श्रीकांत महादेव गोरे (रा. शिरपूर) असे आरोपीचे नाव आहे.

शुक्रवार (दि. १४) रात्री ८ वाजेपासून बेपत्ता असलेल्या शिरपूर येथील मुरलीधर उर्फ चेतन धोंडूलाल मुंदडा (२२) या युवकाचा मृतदेह १६ जानेवारीला सकाळच्या दरम्यान गावानजीकच्या एका विहिरीमध्ये तरंगताना आढळून आला होता. मृतकाच्या डोक्यावर व चेहऱ्यावर खोल जखमा आढळून आल्याने याप्रकरणी घातपाताची शक्यता वर्तविली जात होती. याप्रकरणी मृतकाचे काका कचरूलाल जोधराज मुंदडा यांच्या फिर्यादीनुसार, श्रीकांत गोरे हा मृतक चेतनचा चांगला मित्र होता. चेतन हा श्रीकांतला अडीअडचणीत मदत करीत होता. काही दिवसांपूर्वी चेतनने श्रीकांतला दहा हजार रुपये उसने दिले होते. ते पैसे परत मागितल्याने श्रीकांतने चेतनला १४ जानेवारी रोजी सायंकाळी ५ च्या दरम्यान दुचाकीवर बसवून बाहेर नेले. उशिरापर्यंत ते दोघे घरी परत आले नसल्याने याप्रकरणी शिरपूर पोलिसात फिर्याद देण्यात आली. १६ जानेवारीला श्रीकांत गोरे याच्या वडिलांच्या नावाने असलेल्या शेतातील विहिरीमध्ये चेतनचा मृतदेह आढळून आला. शिरपू पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत आरोपीला ताब्यात घेण्यासाठ पथक रवाना केले. या पथकाने आरोप श्रीकांत गोरे याला चांडस येथून ताब्यात घेतले. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक जगदीश बांगर करीत आहेत. या प्रकरणात आणखी कोणी सहआरोपी आहेत का? या अनुषंगान तपास करण्यात यावा, अशी मागणी माहेश्वरी समाज वाशिम जिल्ह्याच्य शिष्टमंडळाने ठाणेदारांकडे केली.

### आरोपीस २४ तासांतच अटक

पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीलकुमार पुजारी, पोलीस निरीक्षक सुनील वानखडे यांच्या मार्गदर्शनात तपास पथकातील सहायक पोलीस निरीक्षक जगदीश बांगर, पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष पाईकराव, पोलीस कर्मचारी मनोज काकडे, गौरीशंकर तेलंगे, मनोज ब्राह्मण, रामेश्वर जोगदंड यांनी आरोपीला चांडस येथून २४ तासांतच अटक केली.

Hello Washim
Page No. 1 Jan 18, 2022
Powered by: erelego.com